**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**पाहिजे**

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मानधन तत्वावर **"कर सल्लागार" (Tax Consultant)** नियुक्त करावयाचा आहे. त्यासाठी पात्र व्यक्तीकडून विहीत नमुन्यात दि.०५/१०/२०१७ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व नियुक्तीच्या अटी व शर्ती www.vitthalrukminimandir.org या संकेत स्थळावर व तुकाराम भवन, पंढरपूर येथे पाहण्यास उपलब्ध आहेत.

क्र.आस्थापना/का.वि./११८५/२०१७ दि.२०/०९/२०१७

स्वा/—
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र.: ०२१८६—२२४४६६)

## श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
## अटी व शर्ती (जाहिरात दि.२२/०९/२०१७).

१. अर्जदाराचे वय कमाल ६५ वर्षे असावे. जन्मतारखेचा पुरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच तो सोलापूर जिल्ह्यातील रहिवाशी असावा.

**२. पात्रता.**

(अ) अर्जदार सनदी लेखापाल (Chartered Accountant) असावा.

(ब) अर्जदारास शासनाच्या प्रचलित कर कायदे, Income Tax नियम, VAT कायदा, वस्तू व सेवा कर नियम (GST), ताळेबंद, नफा—तोटा पत्रक तसेच अंतर्गत लेखा परिक्षणाचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

(क) अर्जदारास संगणक ज्ञान, MSCIT, MS Tally इत्यादीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(ड) अर्जदारास कमीत कमी पाच वर्षांचा संबंधित कामाचा व आयकर परतावा भरण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. सदर पदावरील पात्र उमेदवाराची निवड तज्ञ अधिकारी व मंदिर समिती पदाधिकारी यांचेकडून मुलाखतीद्वारे करण्यात येईल.

४. सदर भरतीसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण लागू नाही.

५. उमेदवारास मुलाखतीवेळी आवश्यक ती मुळ कागदपत्रे व त्यांच्या सांक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.

६. अर्जासोबत आपल्या नावे कोणताही गुन्हा दाखल नसलेबाबत संबंधीत पोलीस स्टेशनचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

७. सदरची नियुक्ती ११ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर करण्यात येईल. तसेच दर तीन महिन्यानी कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

८. ११ महिने पुर्ण झालेनंतर कामातील प्रगती आणि कामाची गरज विचारात घेवून, संबंधितांकडून योग्य अटी व शर्तीचे बंधपत्र घेवून, त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवणेबाबत विचार करण्यात येईल.

९. सदर नियुक्तीद्वारे मंदिर समितीकडे कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार उमेदवारास राहणार नाही.

१०. गुणवत्ता पाहून पहिल्या वर्षामध्ये रू.१०,०००/— प्रतिमहा मानधन देण्यात येईल व नियुक्तीच्या पहिल्या वर्षात मानधनामध्ये वाढ देण्यात येणार नाही. तसेच मानधना व्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ अथवा भत्ते लागू होणार नाहीत.

११. काम मध्येच सोडावयाचे असल्यास तशी एक महिना अगोदर नोटीस देणे आवश्यक राहील. अचानक काम सोडता येणार नाही. अचानक काम सोडणेस एक महिन्याचे मानधन जमा करावे लागेल.

१२. कामाची प्रगती व वर्तन असमाधानकारक असल्यास तात्काळ कामावरुन कमी करण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना राहील.

१३. श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरात आपल्या कुटुंबातील व्यक्ती कामाला असल्यास अर्ज करता येणार नाही.

१४. प्रशासकीय व अन्य कारणास्तव सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकारी मंदिर समितीने राखून ठेवला आहे.

१५. निवड झाल्यास नेमणुकीच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत रु.१००/- च्या स्टॅप पेपरवर तहसीलदार यांचे समोर सादर केलेले प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

**१६. <u>कामकाजाचे स्वरूप :-</u>**

(१) मंदिर समितीच्या सर्व विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण करणे व लेखापरिक्षणातील आक्षेपांची पूर्तता करणे.

(२) मंदिर समितीचे वार्षिक आयकर रिटर्न भरून आयकर विभागाकडे दाखल करणे.

(३) व्यवसाय कर रिटर्न भरून आयकर विभागाकडे दाखल करणे.

(४) वस्तू व सेवा कर नियम (GST) नियमानुसार मंदिरे समितीचे रिटर्न विहित नमुन्यात ऑनलाईन दाखल करणे.

(५) शासनाच्या प्रचलित सर्व कर कायद्यानुसार मंदिर समितीच्या विविध साहित्य व सेवांची खरेदी / विक्रीच्या करविषयक कामाबाबत योग्य कार्यवाही करणे.

(६) मंदिराचा वार्षिक ताळेबंद (Balance Sheet) व नफा- तोटा पत्रक तयार करणे.

(७) आयकर विभाग तसेच सेवा कर विभागाकडून येणाऱ्या आक्षेपांची पूर्तता करणे व सदर आक्षेप तातडीने निकाली काढण्यासाठी पत्र व्यवहार करणे.

(८) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) कायद्यानुसार मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांचे व मंदिराचे अंशदान जमा करण्याची व सदर कार्यालयाकडून येणाऱ्या आक्षेपांची पूर्तता करण्यासाठी कार्यवाही करणे.

(९) ''पंढरपूर मंदिरे अधिनियम, १९७३'' मधील तरतुदीनुसार आवश्यक आर्थिक बाबींविषयक कार्यवाही करणे.

(१०) मंदिर समितीमार्फत वेळोवेळी सोपविण्यात येणारी कर विषयक जबाबदारी पार पाडणे.

-----XXX-----

**अर्ज**

दिनांक      /०९/२०१७

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारीसो.
श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि. सोलापूर.

विषय :– कर सल्लागार पदाच्या नियुक्तीसाठी अर्ज.

संदर्भ :– दिनांक २२/०९/२०१७ रोजीचे दै.दिव्य मराठी, सोलापूर या वर्तमानपत्रातील प्रसिध्द झालेली जाहिरात.

महोदय,

कारणे विनंती अर्ज करतो/करते कि, संदर्भात नमुद जाहिरातीला अनुसरून मी **<u>कर सल्लागार</u>** पदासाठी अर्ज करीत आहे. मी श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात काम करण्यास इच्छूक आहे. सदर कामाचा मला पुरेसा अनुभव आहे. तरी माझ्या अर्जाचा सहानूभूतीपूर्वक विचार करून मला सेवा करण्याची संधी द्यावी ही विनंती.

माझी वैयक्तीक माहिती खालील प्रमाणे –

१) पुर्ण नाव ————————————————————

२) फर्मचे नाव ————————————————————

३) पूर्ण पत्ता ————————————————————

————————————————————

४) संपर्क क्रमांक ————————————————————

५) जन्मतारीख व वय    दि.   /   /१९    वय : ———— वर्षे.
(एस.एस.सी. बोर्ड प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत जोडावी)

६) शैक्षणिक पात्रता ————————————————————

७) कामाचा अनुभव ————————————————————

८) प्रतिमहा मानधनाची अपेक्षा ————————————————————

(कृ.पा.प.)

तरी वरील प्रमाणे माझी सर्व माहिती खरी व बरोबर आहे. सदर नियुक्ती बाबतच्या जाहिरातीतील आणि अर्जासोबतच्या अटी व शर्तीनुसार मी या पदास पात्र आहे. मी सदर अटी व शर्ती वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत. तरी माझ्या अर्जाचा सहानभूतीपूर्वक विचार करून कर सल्लागार या पदावर काम करण्याची संधी मला द्यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

(पूर्ण नांव, स्वाक्षरी व फर्मचा शिक्का)

सोबत खालील कागदपत्राच्या सत्यप्रती जोडल्या आहेत.

१) शैक्षणिक प्रमाणपत्रे.

२) सनदी लेखापाल पदवी व नोंदणी प्रमाणपत्र.

३) आधारकार्ड.

४) पॅनकार्ड.

५) इतर कागदपत्रे.